## व्यक्तीगत मार्गदर्शन:

प्रवासाला निघताना प्रत्येक व्यक्तीबाबत विचार होणे गरजेचे आहे. कारण त्याचे वय, आजार आणि सवयी लक्षात घेणे आवश्यक आहे. प्रवासाला निघण्यापूर्वी वयस्क व्यक्तीने वैद्यकीय तपासणी करू न घ्यावी. विशिष्ठ आजार असल्यास औषधे जवळ बाळगावीत व नियमीत घ्यावीत. महत्वाची प्रासंगीक औषधे सोबत ठेवावीत व डॉक्टराच्या सल्ल्याने ती वापरावीत.

ओळख पत्र : प्रवासात ओळख पत्र अत्यंत महत्वाचे असते. शासकीय, निमशासकीय सेवेत किंवा खाजगी कंपनीत असल्यास त्याचे ओळख पत्र सोबत असू द्यावे. ओळख पत्रात वयाची नोंद, ओळख चिन्ह, अलीकडे काढलेला फ़ोटो, जवळचा फ़ोन नंबर सहीत पूर्ण पत्ता असू द्यावा.

प्रवासासोबत सामान: प्रवासासोबत सामान सुटसुटीत असावे. निघताना ५ मिनिटात बांधून तयार व्हावे. लहान बॅटरी , काडी पेटी, मेणबत्ती धर्मशाळेत खोलीला लावण्यासाठी कुलूप ,पाण्यासाठी वॉटर बॅग असावी.